**पुणे महानगर मेट्रो रेल प्रकल्प टप्पा-१ मधील मार्गिका क्र. १ (पिंपरी चिंचवड ते स्वारगेट) व मार्गिका क्र. २ (वनाझ ते रामवाडी) या मार्गिकेंच्या सुधारित प्रस्तावास मंजूरी देणे.**

**महाराष्ट्र शासन**

**नगर विकास विभाग**

शासन निर्णय क्रमांक : पीएमआर-३३१६/प्र.क्र.१३२/नवि-७,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २३ डिसेंबर , २०१६.

संदर्भ : शासन निर्णय क्रमांक : पीएमआर-३३१३/प्र.क्र.२९/नवि-७, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २९ ऑक्टोबर, २०१३

**प्रस्तावना :**

पुणे महानगर प्रदेशातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम करण्याच्या दृष्टीने पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात, मेट्रो रेल्वे कार्यान्वित करण्याचा निर्णय राज्य शासनाने पुणे मेट्रो रेल्वे प्रकल्पातील मार्गिका क्र.१ पिंपरी चिंचवड ते स्वारगेट -लांबी १६.५८९ कि.मी. व मार्गिका क्र.२ वनाज ते रामवाडी -लांबी १४.९२५ कि.मी. यास दिनांक ३० सप्टेंबर २०१३ रोजी झालेल्या मंत्रीमंडळाच्या बैठकीमध्ये मान्यता दिली. त्यासोबतच पुणे महानगर मेट्रो प्रकल्पाच्या "पिंपरी ते निगडी" आणि "स्वारगेट ते कात्रज" अशा वाढीव मेट्रो मार्गिकेस (एकूण १५ की.मी. वाढीव लांबी) तत्वत: मान्यता देण्यात आली आहे.. त्यानुसार पुणे मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या सदर प्रस्तावास क्र.पीएमआर-३३१३/ प्र.क्र.२९/ नवि-७, दि.२९/१०/२०१३ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली.

२.० पुणे मेट्रो रेल्वे प्रकल्पातील मार्गिका क्र.१ पिंपरी चिंचवड ते स्वारगेट -लांबी १६.५८९ कि.मी. व मार्गिका क्र.२ वनाज ते रामवाडी -लांबी १४.९२५ कि.मी. यास केंद्र शासनाने दिनांक ११ फेब्रुवारी २०१४ रोजी तत्वता मान्यता दिली. तदनंतर दि. ०२.०९.२०१४ च्या पत्रान्वये केंद्रशासनाकडे अंतीम मान्यतेसाठी प्रस्ताव पाठविण्यात आला. तथापि दरम्यान सदर प्रल्पाच्या आखणीबाबत काही आक्षेप आले.

३.० सदर प्रकल्पाच्या आखणी बाबत आलेल्या आक्षेपांच्यानुषंगाने शासनाने एक समिती स्थापन केली होती. उक्त समितीने मार्गिका क्र.१, पिंपरी चिंचवड ते स्वारगेट यामार्गिकेची आखणी कायम ठेवून वनाज ते रामवाडी मार्गिकेत काही बदल करण्याची शिफारस केली. सदर प्रकल्पाची सुसाध्यता कायम ठेवून समितीने केलेल्या शिफारशीं च्या अनुषंगाने वनाज ते रामवाडी मार्गिकेत किंचित बदल करून माहे नोव्हेंबर २०१५ च्या सुधारित दराचा सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) दिल्ली मेट्रो रेल्वे महामंडळाने (डीएमआरसी) तयार करून सादर केला आहे. सुधारित प्रकल्प अहवालात मार्गिका क्र.२ वनाज ते रामवाडी जंगली महाराज, संचेती

Scanned by CamScanner

चौक, सिव्हील कोर्ट, बाबासाहेब आंबेडकर चौक मार्गे पुणे स्टेशनला जाण्याऐवजी खंडुजीबाबा चौक मार्गे नदीकाठाने महापालिका भवन, धान्य गोडाऊन (कामगार पुतळा), मार्गे पुणे स्टेशनवरून पुढे पूर्वीच्याच आराखडयानुसार रामवाडी पर्यंत एलिव्हेटेड (उन्नत) प्रस्तावित आहे.

४.० सदर समितीच्या शिफारशीनुसार मार्गिकांची आखणी केल्यानंतर आवश्यक बदलासह दोन्ही मार्गिकांची एकूण लांबी ३१.२५४ कि.मी. आहे. डीएमआरसीने सादर केलेला सुधारित प्रकल्प अहवालात प्रकल्पाची किंमत नोव्हेंबर २०१५ च्या भाव पातळीवर ठरविण्यात आली सदर किंमत एसपीव्ही मॉडेलसाठी आयडीसीसह ही किंमत रु ११४२० कोटी अशी अपेक्षित आहे.

५.० सदर सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) केंद्रशासनाकडे मान्यतेसाठी दिनांक ७ डिसेंबर २०१५ च्या पत्रान्वये पाठविण्यात आला आहे. सदर प्रकल्प अहवालाबाबत केंद्रीय विविध मंत्रालयांनी उपस्थित केलेल्या मुद्यांचे खुलासे केंद्रशासनास सादर करण्यात आले आहेत. सदर प्रकल्पाच्या मंजूरीसाठी आयोजित करण्यात आलेल्या प्री-पीआयबी बैठकीत उपस्थित केलेल्या मुद्यांचे खुलासे केंद्रशासनास सादर करण्यात आहेत. पुणे मेट्रो रेल्वे प्रकल्प मंजूरीसाठी दिनांक १४ ऑक्टोबर, २०१६ रोजी पीआयबीची बैठक केंद्रशासनाच्या स्तरावर संपन्न झाली. पब्लिक इन्व्हेस्टमेंट बोर्ड (पीआयबी) यांचे शिफरशी नंतर केंद्रीय मंत्रिमंडळाने पुणे मेट्रो रेल्वे प्रकल्पास दिनांक ७/१२/२०१६ रोजी मान्यता दिली आहे.

६.० राज्यातील मुंबई महानगर प्रदेशातील मुंबई मेट्रो व नवी मुंबई मेट्रो प्रकल्पांची अंमलबजावणी संबंधित यंत्रणांकडून सुरु झाली असल्याने मुंबई महानगर प्रदेशातील मेट्रो रेल्वे प्रकल्पा व्यतिरिक्त राज्यातील अन्य शहरातील मेट्रो रेल्वे प्रकल्पांच्या अंमलबजावणीसाठी एकच राज्यस्तरीय विशेष हेतू वहन कंपनी (SPV) ठेवण्याच्या अनुषंगाने, यापूर्वी स्थापन झालेल्या नागपूर मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनचे ( केंद्र व राज्य शासनाचा संयुक्त उपक्रम), राज्यस्तरीय महाराष्ट्र मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशन अशा केद्र व राज्य शासनाचा ५०:५० संयुक्त सहभाग असलेल्या विशेष हेतू वहन कंपनी (SPV) मध्ये तूर्तास परिवर्तन करण्यास व पुणे मेट्रो रेल्वे प्रकल्पासाठी वेगळी विशेष हेतू वहन (SPV) स्थापन करण्याऐवजी सदर प्रकल्पाची अंमलबजावणी या एकाच राज्यस्तरीय विशेष हेतू कंपनीकडे सोपविण्याबाबत अनुकूलता असल्याचे केंद्रशासनास कळविले आहे. या अनुषंगाने केंद्रीय मंत्रिमंडळाने पुणे मेट्रो रेल्वे प्रकल्पास दिनांक ७/१२/२०१६ रोजी मान्यता देताना यापूर्वी स्थापन झालेल्या नागपूर मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनचे ( केंद्र व राज्य शासनाचा संयुक्त उपक्रम) राज्यस्तरीय महाराष्ट्र मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशन अशा केद्र व राज्य शासनाचा ५०:५० संयुक्त सहभाग असलेल्या विशेष हेतू वहन कंपनी (SPV) मध्ये परिवर्तन करण्यास तसेच पुणे महानगर मेट्रो रेल प्रकल्प राबविण्यासाठी" महाराष्ट्र मेट्रो रेल कॉपोरेशन लिमिटेड " या केंद्र व राज्य शासनाचा संयुक्त उपक्रम असलेल्या स्पेशल पर्पज व्हेईकल (एस.पी.व्ही.) कंपनीकडे सोपविण्यास मान्यता दिली आहे.

Scanned by CamScanner

७.० पुणे महानगर मेट्रो रेल प्रकल्प टप्पा-१ मधील मार्गिका क्र. १ (पिंपरी चिंचवड ते स्वारगेट) व मार्गिका क्र. २ (वनाझ ते रामवाडी) या मार्गिकेंच्या सुधारित प्रस्तावास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. या संदर्भात सर्वंकष विचारांती शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय :-**

पुणे महानगर मेट्रो रेल प्रकल्पातील टप्पा-१ मधील "मार्गिका क्रमांक-१ : पिंपरी चिंचवड ते स्वारगेट" या मार्गिकेस व "मार्गिका क्रमांक -२ : वनाझ ते रामवाडी" या मार्गिकेच्या सुधारित प्रस्तावास पुढीलप्रमाणे मान्यता देण्यात येत आहे.

१. पुणे महानगर मेट्रो रेल प्रकल्पांतर्गत पहिल्या टप्यातील पिंपरी चिंचवड ते स्वारगेट -लांबी १६.५८९ कि.मी. व मार्गिका क्र.२ वनाज ते रामवाडी -लांबी १४.६६५ कि.मी. या रु ११४२० कोटी किमंतीच्या उन्नत व अंशत: भूयारी मेट्रो प्रकल्पास या प्रकल्पाच्या खर्चाच्या किंमतीत कोणत्याही कारणाने वाढ झाल्यास त्याचे दायित्व राज्य शासनावर न येता तो भार पूर्णत: विशेष हेतू वहन कंपनीचा राहील या अटीवर मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर प्रकल्पाच्या एस.पी.व्ही. मॉडेल अंतर्गत दर्शविलेल्या सोबतच्या परिशिष्ट -१ मध्ये नमूद केलेल्या आर्थिक सहभागास सदर प्रकल्पासाठी आंतरराष्ट्रीय अर्थसंस्थांकडून घ्यावयाच्या कर्जाच्या व्याज व मुद्दलाची परतफेड करण्याची जबाबदारी पूर्णत: विशेष हेतू वहन कंपनीची राहील व त्या कर्जाचे कोणतेही दायित्व राज्यशासनावर येणार नाही या अटीवर मान्यता देण्यात येत आहे.

३. सदर प्रकल्पासाठी राज्य शासनाचा समभाग रु. १३१० कोटी तसेच केंद्र शासनाचे कर (५०%) साठी रु. ६४४ कोटी आणि राज्यस्तरीय/स्थानिक करावरील खर्चासाठी रु ३०२.२० कोटी असे ९४६.२० कोटी राज्य शासनाकडून दुय्यम कर्जसहाय्य हे त्याची व्याजासह परतफेड करण्याची जबाबदारी संबंधीत विशेष हेतू वहन कंपनीची राहील या अटीवर देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

४. राज्यातील मेट्रो रेल्वे प्रकल्पांच्या अंमलबजावणीसाठी एकच राज्यस्तरीय विशेष हेतू वहन कंपनी (SPV) ठेवण्याच्या अनुषंगाने यापूर्वी स्थापन झालेल्या नागपूर मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनचे ( केंद्र व राज्य शासनाचा संयुक्त उपक्रम) राज्यस्तरीय महाराष्ट्र मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशन अशा केंद्र व राज्य शासनाचा ५०:५० संयुक्त सहभाग असलेल्या विशेष हेतू वहन कंपनी (SPV) मध्ये परिवर्तन करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

५. पुणे महानगर मेट्रो रेल प्रकल्पांतर्गत सदर दोन्ही मार्गिकांचे प्रकल्प राबविण्यासाठी" महाराष्ट्र मेट्रो रेल कॉपोरेशन लिमिटेड " या नावांने स्थापन केलेल्या केंद्र व राज्य शासनाचा संयुक्त उपक्रम असलेल्या स्पेशल पर्पज व्हेईकल (एस.पी.व्ही.) कंपनीकडे सोपविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

६. " महाराष्ट्र मेट्रो रेल कॉपोरेशन लिमिटेड " या कंपनीस सदर प्रकल्प अंमलबजावणी संबंधातील अधिकार दिल्ली मेट्रो रेल कॉपोरेशन (डी.एम.आर.सी.) च्या धर्तीवर देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

Scanned by CamScanner

७. सोबतच्या परिशिष्ट -१ मध्ये नमूद केलेल्या आर्थिक सहभाग ढाच्यातील राज्यशासनाच्या २०% सहभाग हिश्यामध्ये शासकीय जमिनीची किंमत धरुन प्रकल्पासाठी आवश्यक असलेली शासकीय जमिन प्रचलित मुल्यांवर" महाराष्ट्र मेट्रो रेल कॉपोरेशन लिमिटेड " या एस.पी.व्ही. (SPV) कंपनीकडे वर्ग करण्यास सदर प्रकल्पासाठी खाजगी जमिनिचे भू-संपादन करावे लागल्यास त्याबाबतचा भार राज्य शासनावर राहणार नाही व तो भार विशेष हेतू वहन कंपनीने उचलणे बंधनकारक राहील या अटीवर मान्यता देण्यात येत आहे.

८. सदर प्रकल्प राबविण्यासाठी केंद्र शासन व रेल्वे प्रशासनाशी आवश्यक तो पत्र व्यवहार करण्यास व केंद्र शासनाकडून त्यांच्या सहभाग हिश्याचा २०% निधी मिळविण्यासाठी महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

९. वरील सुधारित केलेल्या मान्यतेखेरीज यापूर्वी मान्यता दिलेल्या संदर्भाधीन क्र.पीएमआर-३३१३/ प्र.क्र.२९/ नवि-७, दि.२९/१०/२०१३ च्या शासन निर्णयातील मान्यता कायम ठेवण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१०. सदर प्रकल्पामध्ये केंद्र व राज्य शासनाचा आर्थिक सहभाग हा सदर प्रकल्पाच्या निविदा स्वीकृतीनंतर येणाऱ्या प्रत्यक्ष किंमतीवर आधारित मान्य करण्याबाबत केंद्र शासनास विनंती करण्यात यावी.

सदरचा शासन निर्णय वित्त विभाग अनौपचारीक संदर्भ क्र. विवि/शिकाना/ १८३ दिनांक ७ डिसेंबर, २०१६ अन्वये प्राप्त अभिप्राय व त्यासंदर्भात मंत्रिमंडळाने दिनांक ८ डिसेंबर , २०१६ रोजीच्या बैठकीत दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१६१२२३१६१६५४२१२५ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

23/12/2016

(श्रीराम यादव)
उपसचिव, महाराष्ट्र राज्य

प्रति,

मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य, यांचे सचिव.
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
मा. राज्यमंत्री (नवि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
प्रधान सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
प्रधान सचिव (नवि-१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

Scanned by CamScanner

प्रधान सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
प्रधान सचिव (परिवहन), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
सचिव (नवि-२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
सचिव (विशेष प्रकल्प), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
महानगर आयुक्त, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण औंध पुणे
विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे.
जिल्हाधिकारी, पुणे.
पोलिस आयुक्त, पुणे.
व्यवस्थापकीय संचालक, मुंबई मेट्रो रेल कार्पोरेशन मुंबई.
व्यवस्थापकीय संचालक, नागपूर मेट्रो रेल कार्पोरेशन मुंबई.
महाव्यवस्थापक, मध्य रेल्वे, मुंबई.
आयुक्त, पुणे महानगरपालिका, पुणे.
आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-चिंचवड.
महाव्यवस्थापक, पुणे महानगर परिवहन महामंडळ मर्यादित, पुणे.
सह सचिव, नगर रचना, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
संचालक, नगर रचना, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, पुणे.
उप सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
कार्यासन अधिकारी (नवि-२२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
निवड नस्ती (नवि-७).



Scanned by CamScanner